**बृहन्मुंबई महानगरपालिका**

घन कचरा व्यवस्थापन, पी/दक्षिण

सहाय्यक अभियंता(घकव्य )पी/दक्षिण यांचे कार्यालय,पी/दक्षिण विभाग कार्यालय,सी.टी.एस.क्र. ७४६,व्हिलेज पहाडी स्वामी विवेकानंद मार्ग,गोरेगाव(पश्चिम),मुंबई

क्र.सहा.अभि.(घकव्य)/5319/पी/दक्षिण दिनांक 19/08/2025

# सुचना

**विषय:** पी/दक्षिण विभागात गणेशोत्सव- 2025 करीता विसर्जन स्थळांच्या परिसराकरीता स्वच्छतेकरीता कामगारांचा पुरवठा करण्याकरीता अशासकीय संस्थांची नेमणूक करणेबाबत.

**पी/दक्षिण विभागाच्या प्रशासकीय हद्दीतील संस्थांना** याद्वारे सुचित करण्यात येते की, पी/दक्षिण विभागात गणेशोत्सव-2025 करीता विसर्जन स्थळांच्या परिसराकरीता स्वच्छतेकरीता कामगारांचा पुरवठा करण्याकरीता 05 अशासकीय संस्थेची सोडत पद्धतीने निवड करण्याचे प्रस्ताविलेले आहे.

अर्ज तसेच योजनेच्या अटी व शर्ती सहाय्यक अभियंता (घकव्य) पी/दक्षिण विभाग ह्यांच्या कार्यालयात निशुल्क उपलब्ध असून त्या **दि.19 ऑगस्ट,2025 ते दि. 22 ऑगस्ट,2025** पर्यंत **सकाळी 11:00 ते दुपारी 04:00** वाजेपर्यंत मिळतील. अर्ज भरताना सोबत छाननी शुल्क रु. 363/- अधिक 18% जीएसटी इतके रोखीने नागरीक सुविधा केंद्रामध्ये भरलेल्याची पावती जोडणे अनिवार्य आहे. इच्छूक अशासकीय संस्थांनी आपले अर्ज सहाय्यक अभियंता (घकव्य) पी/दक्षिण यांच्या कार्यालयात **दि.23 ऑगस्ट, 2025 दुपारी 04:00 वाजेपर्यंत** सादर करावेत. नमूद केलेल्या कार्यालयीन कालावधीनंतर दाखल करण्यात आलेले अर्ज विचारात घेण्यात येणार नाही.

सदर कामाच्या अटी व शर्ती नुसार पात्र ठरलेल्या संस्थांपैकी **05 अशासकीय संस्थांची दि. 25 ऑगस्ट,2025 रोजी दुपारी 3:00 वाजता सोडत पद्धतीने** सदर कामाकरीता निवड करुन कामाची संधी देण्यात येईल. सदर सोडतीस पात्र संस्थांच्या पदाधिका-यांस उपस्थित रहाणे बंधनकारक असेल. सोडती बाबत सर्व अधिकार महानगरपालिका राखून ठेवत आहे.

**(टिपः सदर सोडतीस संस्थेचे प्रतिनिधी उपस्थित नसल्यास संस्था सहभागी करता येणार नाही)**

**सही/-**

**सहा.अभि(घकव्य)पी/दक्षिण**